
Journalism Chair


Journalism Chair
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
ज्ञानमेवामृतम्
Estd : 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52





लोकमत

मस्ट READ

# शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या मूल्यचौकटीचा वारसा

## डॉ. राधेश्याम जाधव : 'शाहूपूर्व व शाहूकालीन वर्तमानपत्रे' या पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पत्रकारितेच्या क्षेत्राने शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांनी प्रदान केलेल्या मूल्यांच्या चौकटीचा वारसा पुनःपुन्हा अधोरेखित करीत राहून त्याची नव्याने मांडणी करीत राहिले पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. राधेश्याम जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए. मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्या 'शाहूपूर्व व शाहूकालीन वर्तमानपत्रे' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते 'शाहूकालीन पत्रकारितेची मूल्यमीमांसा' या विषयावर बोलत होते.अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. मास कम्युनिकेशन विभागाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास मान्यवरांची उपस्थिती लाभली.

डॉ. राधेश्याम जाधव म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लढा हा सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी होता. यामध्ये कोणत्याही स्वरुपाच्या भेदभावाला थारा नव्हता. या मूल्यांच्या प्रस्थापनेचा वसा घेऊन सत्यशोधक चळवळीतील वर्तमानपत्रे कार्यरत झाली आणि त्यांनी माहितीच्या पलीकडे जाऊन ज्ञानाच्या निर्मितीवर भर दिला.



डॉ. शिवाजी जाधव यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करताना मान्यवर उपस्थित होते.

यावेळी डॉ. जयप्रकाश पाटील यांनी स्वागत व परिचय करून दिला. डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रवीण पांढरे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाला डॉ. शरद बनसोडे, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. जे.के. पवार, इंद्रजीत सावंत, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. जी.बी. कोळेकर, वसंतराव मुळीक, वासुदेव कुलकर्णी, सचिन सूर्यवंशी, डॉ. सुभाष कोंबडे, डॉ. नितीन माळी, शशिकांत पंचगल्ले, उमेश सूर्यवंशी, डॉ. अरुण शिंदे, जयसिंग पाटील, गुरुबाळ माळी, चारुदत्त जोशी, डॉ. श्रीरंग गायकवाड, राजेंद्रकुमार चौगुले, कृष्णात जमदाडे, डॉ. रत्नाकर पंडित, तेज दर्वे, गणेश खोडके उपस्थित होते.

लोकमत

# ‘शाहूपूर्व, शाहूकालीन वर्तमानपत्रे’चे शनिवारी प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव लिखित ‘शाहूपूर्व व शाहूकालीन वर्तमानपत्रे’ या पुस्तकाचे प्रकाशन ‘द हिंदू’ वृत्तपत्र समूहाचे सिनिअर डेप्युटी एडिटर डॉ. राधेश्याम जाधव यांच्या हस्ते येत्या शनिवारी सकाळी ११ वाजता मास कम्युनिकेशन विभागात होणार आहे. ‘शाहूकालीन पत्रकारितेची मूल्यमीमांसा’ या विषयावर ते व्याख्यान देणार आहेत. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी आहेत. शाहूपूर्व आणि राजर्षी शाहू यांच्या काळात कोल्हापुरात कोणती वर्तमानपत्रे प्रसिद्ध होत होती आणि त्या काळात कोणते विषय हाताळले या विषयावर या पुस्तकात तपशीलवार मांडणी केली आहे.

Hello Kolhapur
Page No. 2 Apr 02, 2025
Powered by: erelego.com

# सस्नेह निमंत्रण!


## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मास कम्युनिकेशन विभाग

**डॉ. शिवाजी जाधव** लिखित

**' शाहूपूर्व आणि शाहूकालीन वर्तमानपत्रे '**

पुस्तकाचे प्रकाशन




हस्ते

**डॉ. राधेश्याम जाधव**

सिनिअर डेप्युटी एडिटर,

द हिंदू वृत्तपत्र समूह, पुणे

अध्यक्ष

**प्रा. डॉ. दिगंबर शिर्के**

कुलगुरू,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विनीत

**डॉ. विलास शिंदे**

कुलसचिव,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. शिवाजी जाधव**

समन्वयक,

मास कम्युनिकेशन विभाग

**दिनांक: शनिवार, ५ एप्रिल, २०२५**

**वेळ: सकाळी ११:०० वाजता**

**स्थळ: मास कम्युनिकेशन विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

# पुढारी

www.pudhari.com

# पुरोगामी विचारांचा वारसा पत्रकारितेने मांडत राहणे महत्त्वाचे : डॉ. राधेश्याम जाधव

## ‘शाहूपूर्व व शाहूकालीन वर्तमानपत्रे’ पुस्तकाचे विद्यापीठात प्रकाशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पत्रकारितेच्या क्षेत्राने शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांनी प्रदान केलेल्या पुरोगामी विचार मूल्यांच्या चौकटीचा वारसा पुन्हापुन्हा अधोरेखित करीत राहून त्याची नव्याने मांडणी करीत राहिले पाहिजे, असे प्रतिपादन ‘दि हिंदू’ दैनिकाचे सिनिअर डेप्युटी एडिटर डॉ. राधेश्याम जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्या ‘शाहूपूर्व व शाहूकालीन वर्तमानपत्रे’ या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते ‘शाहूकालीन पत्रकारितेची मूल्यमिमांसा’ या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. राधेश्याम जाधव म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लढा हा सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी होता. या मूल्यांच्या प्रस्थापनेचा वसा घेऊन सत्यशोधक चळवळीतील वर्तमानपत्रे कार्यरत झाली. राजर्षी शाहू महाराज हे वेदोक्त प्रकरणाकडे मूल्यांसाठीचा लढा याच दृष्टिकोनातून पाहात होते. या मूल्यांतूनच नैतिकता उभी राहते. याच मूल्यचौकटीचा वारसा आजच्या पत्रकारितेनेही पुढे न्यायला हवा.




**कोल्हापूर : डॉ. शिवाजी जाधव लिखित ‘शाहूपूर्व व शाहूकालीन पत्रकारिता’ या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी बोलताना वरिष्ठ पत्रकार-संपादक डॉ. राधेश्याम जाधव. मंचावर डॉ. शिवाजी जाधव, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. (छाया : नाज ट्रेनर)**

डॉ. जयप्रकाश पाटील यांनी स्वागत केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रवीण पांढरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले. यावेळी क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. जे. के. पवार, इंद्रजित सावंत, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, वसंतराव मुळीक आदी उपस्थित होते.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# 'शाहूपूर्व, शाहूकालीन वर्तमानपत्रे'चे शनिवारी विद्यापीठात प्रकाशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी लिहिलेल्या 'शाहूपूर्व व शाहूकालीन वर्तमानपत्रे' या पुस्तकाचे प्रकाशन 'द हिंदू' वृत्तपत्र समूहाचे सिनिअर डेप्युटी एडिटर डॉ. राधेश्याम जाधव यांच्या हस्ते शनिवार दि. ५ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता मास कम्युनिकेशन विभागात होणार आहे.

यावेळी डॉ. राधेश्याम जाधव यांचे 'शाहूकालीन पत्रकारितेची मूल्यमीमांसा'या विषयावर व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थान कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के भूषविणार आहेत.

या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

Kolhapur Edition
Apr 02, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# महामानवांच्या मूल्यचौकटीचा वारसा पत्रकारितेने मांडणे महत्त्वाचे

## -डॉ. राधेश्याम जाधव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पत्रकारितेच्या क्षेत्राने शिव, शाहू, फुले, आंबेडकर या महामानवांनी प्रदान केलेल्या मूल्यांच्या चौकटीचा वारसा पुनःपुन्हा अधोरेखित करीत राहून त्याची नव्याने मांडणी करीत राहिले पाहिजे, असे प्रतिपादन द हिंदू वृत्तपत्र समूहाचे डेप्युटी एडिटर डॉ. राधेश्याम जाधव यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्या 'शाहूपूर्व व शाहूकालीन वर्तमानपत्रे' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी मास कम्युनिकेशन विभागाच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात ते 'शाहूकालीन पत्रकारितेची मूल्यमीमांसा' या विषयावर बोलत होते.




**कोल्हापूर : 'शाहूकालीन पत्रकारितेची मूल्यमीमांसा' या विषयावर बोलताना द हिंदू वृत्तपत्र समूहाचे डेप्युटी एडिटर डॉ. राधेश्याम जाधव.**

डॉ. राधेश्याम जाधव म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लढा हा सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी होता. यामध्ये भेदभावाला थारा नव्हता. या मूल्यांच्या प्रस्थापनेचा वसा घेऊन सत्यशोधक चळवळीतील वर्तमानपत्रे कार्यरत झाली. त्यांनी माहितीच्या पलीकडे जाऊन ज्ञानाच्या निर्मितीवर भर दिला. राजर्षी शाहू महाराज हे वेदोक्त प्रकरणाकडे मूल्यांसाठीचा लढा याच दृष्टिकोनातून पाहात होते. या मूल्यांतूनच नैतिकता उभी राहते. त्यातून नीती शास्त्राची चौकट सामाजिक आयुष्यात उभी राहते, याची जाणीव त्यांना होती. शब्द आणि ग्रंथ प्रामाण्य मानले, तर चिकित्सा थांबते; आणि कर्मसिद्धांतान्वये प्रारब्ध मानले, तर कर्तृत्व थांबते. त्यामुळे या सर्व महामानवांनी या बाबींना स्पष्ट नकार दिला. सर्व प्रकारच्या शोषणाच्या चौकटींना तोंड देण्यासाठी त्यांनी सकारात्मक विचारांची मांडणी केली. त्यांच्या प्रेरणेतून साकार झालेल्या वृत्तपत्रांनीही कधी द्वेषाची मांडणी केली नाही.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, डॉ. राधेश्याम जाधव यांनी अत्यंत विद्वत्तापूर्ण मांडणी केली असून, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पत्रकारिता असताना स्थानिक भारतीयांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीला त्यांनी प्राधान्य दिले, याचा अभिमान वाटतो.

यावेळी डॉ. जयप्रकाश पाटील यांनी स्वागत केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रवीण पांढरे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले. कार्यक्रमास दै. 'पुण्यनगरी'चे निवासी संपादक राजेंद्रकुमार चौगले, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. जे. के. पवार, इंद्रजित सावंत, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. जी. बी. कोळेकर, वसंतराव मुळीक, वासुदेव कुलकर्णी, सचिन सूर्यवंशी, डॉ. सुभाष कोंबडे, डॉ. नितीन माळी, शशिकांत पंचगल्ले, उमेश सूर्यवंशी, डॉ. अरुण शिंदे, डॉ. श्रीराम पवार, जयसिंग पाटील, गुरुबाळ माळी, चारुदत्त जोशी, डॉ. श्रीरंग गायकवाड, कृष्णात जमदाडे, डॉ. रत्नाकर पंडित, तेजा दुर्वे, गणेश खोडके, अश्विनी पाटील, प्रा. टी. के. सरगर, वृषाली पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

Kolhapur Edition
Apr 08, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

# शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच्या मूल्यांचा वारसा अधोरेखित व्हावा : डॉ. जाधव

## 'शाहूपूर्व व शाहूकालीन पत्रकारिता' पुस्तकाचे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ५ : पत्रकारितेच्या क्षेत्राने शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांनी दिलेल्या मूल्यांच्या चौकटीचा वारसा पुनःपुन्हा अधोरेखित करून त्याची नव्याने मांडणी करायला हवी, अशी अपेक्षा ज्येष्ठ पत्रकार डॉ. राधेश्याम जाधव यांनी आज येथे व्यक्त केली.



कोल्हापूर : डॉ. शिवाजी जाधव लिखित 'शाहूपूर्व व शाहूकालीन पत्रकारिता' पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व ज्येष्ठ पत्रकार डॉ. राधेश्याम जाधव.

शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए. मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्या 'शाहूपूर्व व शाहूकालीन वर्तमानपत्रे' पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी ते 'शाहूकालीन पत्रकारितेची मूल्यमीमांसा' विषयावर बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. मास कम्युनिकेशन विभागाच्या सभागृहात कार्यक्रम झाला.

डॉ. जाधव म्हणाले, ''छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लढा सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधूता मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी होता. यात कोणत्याही स्वरूपाच्या भेदभावाला थारा नव्हता. या मूल्यांच्या प्रस्थापनेचा वसा घेऊन सत्यशोधक चळवळीतील वर्तमानपत्रे कार्यरत झाली आणि त्यांनी माहितीच्या पलीकडे जाऊन ज्ञानाच्या निर्मितीवर भर दिला. राजर्षी शाहू महाराज हे वेदोक्त प्रकरणाकडे मूल्यांसाठीचा लढा याच दृष्टिकोनातून पाहात होते. या मूल्यांतूनच नैतिकता उभी राहते. त्यातून नीतीशास्त्राची चौकट सामाजिक आयुष्यात उभी राहते, याची जाणीव त्यांना होती. शब्द आणि ग्रंथ प्रामाण्य मानले, तर चिकित्सा थांबते आणि कर्मसिद्धांतान्वये प्रारब्ध मानले, तर कर्तृत्व थांबते. त्यामुळे या सर्व महामानवांनी या बाबींना स्पष्ट नकार दिला.''

डॉ. शिर्के म्हणाले, ''डॉ. राधेश्याम जाधव यांनी स्थानिक भारतीयांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीला प्राधान्य दिले, याचा अभिमान वाटतो.'' या वेळी क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. सुनीलकुमार लवटे, राजकीय विश्लेषक व ज्येष्ठ पत्रकार डॉ. श्रीराम पवार, डॉ. जे. के. पवार, इंद्रजित सावंत, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. विनोद ठाकूर-देसाई, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. जी.बी. कोळेकर, वसंतराव मुळीक उपस्थित होते. डॉ. जयप्रकाश पाटील यांनी स्वागत केले. प्रवीण पांढरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.

## दृष्टिक्षेपात

# 'शाहूपूर्व वर्तमानपत्रे'चे शनिवारी प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी लिहिलेल्या 'शाहूपूर्व व शाहूकालीन वर्तमानपत्रे' या पुस्तकाचे प्रकाशन पत्रकार डॉ. राधेश्याम जाधव यांच्या हस्ते शनिवारी (ता. ५) सकाळी अकरा वाजता मास कम्युनिकेशन विभागात होणार आहे. यावेळी डॉ. राधेश्याम जाधव हे 'शाहूकालीन पत्रकारितेची मूल्यमीमांसा' या विषयावर विशेष व्याख्यान देणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के असतील. शाहूपूर्व आणि राजर्षी शाहू यांच्या काळात कोल्हापुरात कोणती वर्तमानपत्रे प्रसिद्ध होत होती आणि या वर्तमानपत्रांनी त्या काळात कोणते विषय हाताळले होते, या विषयावर डॉ. शिवाजी जाधव यांनी संदर्भासह पुस्तकात तपशीलवार मांडणी केली असल्याची माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

